# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 09/07/2021 (शुक्रवार)
(सकाळ)

---

### जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांविरूध गुन्हा नोंद

पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 02 कि.मी अंतरावरील माडेकर ले–आऊट, पांढुर्णा रोड, सावनेर येथे सरतर्फे फिर्यादी नामे– सफौ इस्माईल मुजफ्फर शेख पो. स्टे. सावनेर हे दि. 07/07/2021 रोजी ते रात्रपाळी डयुटी ऑफिसर कर्तव्यावर असतांना पोलीस ठाण्यात 23.30 वा. दरम्यान सात ते आठ लोकांनी एका अनोळखी इसमास बेशुदध अवस्थेत पोलीस ठाण्यात आणले. त्यांनी सांगितले की, "हा इसम पांढुर्णा रोडवरील आशिष मानकर, रा. सावनेर यांचे घरासामोर उभा असलेला टिप्परवर चढून त्यास चावी लावून चोरुन नेण्याचे प्रयत्नात असतांना, त्यास रंगेहात पकडले" व लोकांनी जमा होऊन त्यास हातबुक्कीने मारहाण केली. त्यातच तो बेशुदध झाला असे सांगितले तेव्हा त्यास उपचार कामी, सरकारी पोलीस गाडीने पोलिसांनी सावनेर ग्रामीण रुग्णालय येथे ॲडमिट केले. जखमी इसमाचे नाव ज्ञानेश्वर रामजी धुर्वे, वय 35 वर्ष, रा. नांदागोमुख असे असल्याचे समजले. यानंतर त्यांचा भाऊ पदमाकर रामाजी धुर्वे, वय 30 वर्ष यांनी दवाखान्यात आल्यावर जखमीला ओळखुन तो त्यांचा भाऊ ज्ञानेश्वर रामाजी धुर्वे असल्याचे सांगितले. डॉक्टरांनी जखमीस मेयो हॉस्पिटल, नागपूर येथे रेफर केले आहे. तरी ज्ञानेश्वर रामाजी धुर्वे, वय 35 वर्ष, रा. नांदागोमुख यास दि. 07/07/2021 रोजी 23.00 वा. दरम्यान पांढुर्णा रोडवर आशिष मानकर, रा. सावनेर यांचे घरासमोरील उभ्या असलेल्या टिप्परवर चढून त्यास चावी लावून चोरुन नेण्याच्या प्रयत्नात असतांना रंगेहात पकडून अनोळखी लोकांनी बेशुदध होइपर्यंत हातबुक्कीने मारहाण करुन त्यास जिवानिशी ठार मारण्याचा प्रयत्न केले.

सदर प्रकरणी सरतर्फे सफौ इस्माईल मुजफ्फर शेख यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 307 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री मारुती मुळूक मो.क. 9552564047 हे करीत आहे.

### घरफोडी

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत चनकापुर वार्ड क. 2 क्वॉर्टर क. 100/3 येथे दि. 08/07/2021 चे 00.30 वा. ते 01.30 वा. चे सुमारास फिर्यादी नामे– रामविशाल मेहींदी पाल, वय 65 वर्ष, रा. चनकापुर वार्ड क 02 क्वॉर्टर नं. 100/3 यांनी आपले मुली चे लग्नाकरिता 48,000/–रू. नगदी हे घरच्या कपाटात ठेवले असता अज्ञात आरोपीने रात्री दरम्यान कपाटातुन सदर रूपये चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथ आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा सुर्यभान जळते 9673837007 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर